# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०१.२०२२**

## जिल्हा : कोल्हापूर

| मागील आठवड्यातील हवामान (२२.०१.२०२२ ते २८.०१.२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९.०१.२०२२ ते ०३.०२.२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | दिनांक | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| ३३ | ३० | २८ | २७ | २८ | २७.५ | २८.२ | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३१ | ३० | २९ | २९ |
| १४ | १४ | १७ | १२ | १२ | १३.५ | १५.५ | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २० | २० | २० |
| ६ | ० | ७ | ० | ० | ० | ० | स. ढग स्थिती (आकाश) | १ | ० | ० | २ | १ |
| १ | ३ | १ | ० | ० | २ | - | दु. ढग स्थिती (आकाश) | | | | | |
| ९१ | ९७ | ९६ | ९७ | ९५ | ८९ | ९८ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६० | ५९ | ५३ | ५८ | ५१ |
| ४४.० | ४१.० | ४७.० | ४८.० | ५२.० | ४८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४६ | ४५ | ४३ | ४५ | ४० |
| ०.६ | १.५ | १.८ | ०.८ | १.३ | ०.५ | ०.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १२.० | ९.० | ५.० | ६.० | ६.० |
| पु. | ई. | पु. | आ. | द. | नै. | ई. | स. वाऱ्याची दिशा | पु. | पु.ई. | पु. | पु.ई. | ई. |
| द.आ. | उ.ई. | द. | उ. | उ. | प. | - | दु. वाऱ्याची दिशा | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२२ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२२ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ० | ०.० | ०.० |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान २९.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २०.० ते २२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ५१ ते ६०% तर दुपारची सापेक्ष आद्रता ४० ते ४६% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०५ ते १२ कि.मी. पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २ ते ८ फेब्रुवारी दरम्यान कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून अँड्रॉइड ॲप्लिकेशन "मेघदूत " तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ "दामिनी" च्या अंदाजासाठी. अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>➢ शेतकरी बंधूनी कार्यक्षम जलसिंचन व्यवस्थापणासाठी पिकाच्या अवस्थेनुसार, जमिनीच्या प्रकाराप्रमाणे शेतामधील विविध पिकांच्या पाण्याची गरज व सिंचन संच चालू ठेवण्याचा कालावधी ई. महत्वपूर्ण माहिती आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " फुले इरिगेशन शेड्यूलर (PIS)" हे ॲप डाउनलोड करून वापरावे.<br>➢ फळबागेतील तापमान नियंत्रित राहण्यासाठी फळबागांना शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावे. |
| **संदेश** | | ➢ गहू पिक पेरणीस ७० दिवस झाले असल्यास पिकावर १९:१९:१९ या विद्राव्य खताची २०० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| **गहू** | फुलोरा | ➢ गहू पेरणीस ८० ते ८५ दिवस झाले असल्यास दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना पिकास पाणी द्यावे.<br>➢ गहू पिकावरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम २५ डब्लूजी ५० ग्रॅम प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **मका** | शाखीय वाढ | **अमेरिकन लष्करी आळीचे नियंत्रण :**<br>➢ रासायनिक नियंत्रण: १. आळीच्या वाढीच्या सुरवातीच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निंबोळी अर्क ५%यांची ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा** २. थायमेथोक्झाम १२.६ %+ लॅम्डा सायहेलोथ्रीन ९.५ % झेड सी. या मिश्र किटकनाशकाची ०.५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. **किंवा** ३. |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ % एस.सी. या किटकनाशकाची ०.३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.<br>➢ कीटकनाशकाची फवारणी केल्यानंतर मका पिकाचा हिरवा चारा लगेच जनावरांना खायला देऊ नये किंवा असा चारा लगेचच सायलेज तयार करण्यासाठी वापरू नये. |
| **रब्बी ज्वारी** | दाणे भरणे ते पक्वता | ➢ पक्व होत असलेल्या ज्वारी पिकाचे पक्षांपासून संरक्षण करावे.<br>➢ ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपक्याचे लक्षणे दिसताच ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत |
| **हरभरा** | फुलोरा ते घाटे भरणे | ➢ हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत.<br>➢ हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी हेलिओकिल ५०० मिली ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून प्रती हेक्टर फवारणी करावी. |
| **ऊस** | पूर्व हंगामी ऊस | ➢ **पूर्व हंगामी ऊस:** पूर्व हंगामी ऊस पिक लागवडीस ६ ते ८ आठवडे पूर्ण झाले असल्यास रासायनिक खतांची मात्रा नत्र १३६ किलो (युरिया २९५ किलो) प्रती हेक्टरी या प्रमाणात द्यावी.<br>➢ जानेवारी महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ४.०७ मिमी प्रती दिवस एवढा असतो त्यामुळे ऊस पिकास प्रती दिवस २.२४ लिटर एवढ्या पाण्याची गरज असते त्यामुळे ऊस पिकाची पाण्याची गरज पूर्ण होण्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ३४ मिनिटे चालू ठेवावा. |
| **टोमॅटो** | फुलोरा ते फळधारणा | ➢ सकाळी हवेमध्ये जास्त आद्रता असल्याने टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी अॅझॉक्झीस्ट्रोबीन १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **भेंडी** | फुलोरा ते फळधारणा | ➢ भेंडी पिकावरील फळे पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन२.८ % ८ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ % ई.सी.६ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे.<br>➢ कीड नियंत्रणासाठी १० ट्रायकोकार्ड १० प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे. |
| **मिरची** | फुलोरा | ➢ कोरडे हवामान राहण्याची शक्यता असल्याने मिरची पिकावर कोळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी फेनॅक्झाक्विन १० ई.सी.२५ मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ रात्री जनावरे गोठ्यात बांधावीत आणि त्यांना थंडीतून बचावासाठी कोरडी उबदार जागा उपलब्ध करून द्यावी<br>➢ थंडीचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी आहारात पुरेसे प्रथिने आणि खनिजे द्या.<br>➢ हिवाळ्यात जनावरांच्या उर्जेची गरज भागविण्यासाठी नियमितपणे जनावरांना मिश्रणासह मीठ व गव्हाचे धान्य, गूळ इत्यादी 10% - 20% प्रमाणात प्रति दिवस द्यावे.<br>➢ रात्रीच्या वेळी जनावरे / बकरीना उघड्यावर ठेवू नका. |
| **कुक्कुटपालन** | वाढीची | ➢ थंडीपासून बचावासाठी कोंबड्यांच्या शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन वातावरण उबदार ठेवा. |

ठिकाण : २८.०१.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**